POLICE STATION AWDHUTWADI,YAVATMALDIST.YAVATMAL
पोलीस स्टेशन अवधुतवाडी , यवतमाळ जि. यवतमाळ
PH.No.-07232-256714 Email-ps.owadgaonroad.ytml@mahapolice.gov.in

# प्रेस नोट

दिनांक. 11/04/2023

**मा. पोलीस अधीक्षक सा. यवतमाळ यांचे मार्गदर्शनाखाली राबविलेल्या कोबिंग ऑपरेशन दरम्यान अभिलेखावरील गुन्हेगाराच्या घरी मिळुन आले अग्नीशस्त्र**

दि.10/04/2023 रोजी मा. पोलीस अधीक्षक, सा. यवतमाळ यांचे आदेशान्वये पो.स्टे.अवधुतवाडी हद्दी मध्ये कोबिंग ऑपरेशन राबविणे करीता मा. पोलीस अधीक्षक सा. यवतमाळ यांचे मार्गदर्शनाखाली मा. अपर पोलीस अधीक्षक सा. यवतमाळ, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, सा. यवतमाळ, पो.नि. मनोज केदारे पो.स्टे.अवधुतवाडी, पो.नि. दिपमाला भेंडे पो.स्टे.लोहारा, पो.नि. प्रदिप परदेशी स्थागुशा यवतमाळ, व आरसीपी पथक, क्युआरटि पथक व पो.स्टे.अवधुतवाडी, पो.स्टे.यवतमाळ शहर, पो.स्टे.लोहारा येथील पो.स्टाफ असे तिन फोटो उमरसरा येथे एकत्र येवुन कोबिंग ऑपरेशन नुसार अभिलेखावरील गुन्हेगार इसम चेक चे व त्यांचे घर झडती घेणे करीता 20/00 वा. रवाना झालो. 1) रोशन विजय सवईमुल रा. तिन फोटो उमरसरा, यवतमाळ 2) आदिनाथ किसन नेरकर रा. जगतमंदिर रोड, यवतमाळ 3) मयुर किशोर चिंडाले रा. जगत मंदिर जवळ, यवतमाळ 4) संजय दत्ता शिंदे 5) विठ्ठल ढोने रा. तंबाखे ले आऊट 6) पारस राजेश आपटे 7) रघु रामभाऊ नक्षणे रा. संकटमोचन यवतमाळ व इतर आरोपीतांचे घराचे घर झडती घेण्यात आली त्यानंतर अमरईपुरा येथील 23/30 वा. दरम्यान अभिलेखावरील गुन्हेगार निलेश चंदुजी खत्री वय 30 वर्षे रा. अमराईपुरा, यवतमाळ याचे घराची घर झडती घेतली असता स्वयंपाक खोलीतील स्टील च्या डब्या मध्ये एक स्टील सारख्या धातुचे पिस्टल बॅरल कवर मिळुन आले. आरोपी नामे निलेश खत्री यास सदर ची बॅरल कवर कोठुन आणली या बाबत विचारपुस करीत असता उडवा उडवीचे उत्तर देवुन तो एकदम पो.स्टाफ च्या अंगावर धावुन येवुन शासकीय कामात अडथळा करु लागला त्यामुळे पो.स्टाफ चे मदतीने बाजुला बसविले. त्याचे घरी पिस्टल ची स्टील सारख्या धातु ची बॅरल कवर मिळुन आल्याने त्याचे घरा मध्ये अग्नीशस्त्र मिळुन येण्याची दाट शंका आल्याने पंचा समक्ष पो.स्टाफ चे मदतीने त्याचे घराची घरझडती घेतली असता स्वयंपाक खोलीचे बाजुचे बेडरुम मधील लाकडी बॉक्स च्या दिवान मध्ये एक लोखंडी देशी कट्टा (अग्नीशस्त्र) मॅग्झीनसह ज्याच्या ग्रीपवर काळी प्लॉस्टीक ची प्लेट असलेला कि.अं.25,000/- रु. मिळुन आला. निलेश चंदुजी खत्री वय 30 वर्षे रा. अमराईपुरा, यवतमाळ याचे विरुध्द आर्म अॅक्ट अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही मा.श्री.डॉ.पवन बन्सोड, पोलीस अधीक्षक,यवतमाळ, मा.श्री. पियुष जगताप, अपर पोलीस अधीक्षक यवतमाळ, मा.श्री. संपतराव भासले उपविभागीय पोलीस अधिकारी, यवतमाळ यांचे मार्गदर्शनाखाली श्री.मनोज केदारे, पोलीस निरीक्षक, पो.स्टे.अवधुतवाडी, पो.नि. दिपमाला भेंडे पो.स्टे.लोहारा, पो.नि. प्रदिप परदेशी, स्थागुशा यवतमाळ, पो.स्टे.अवधुतवाडी येथील पोहवा/गजानन वाटमोडे, पोहवा/ सुरेश मेश्राम, पोहवा/गजानन दुधकोहळे, पोना/आशिष भुसारी, पोना/ मेसरे, पोशि/ प्रशांत राठोड, पोशि/ बबलु पठाण, पोशि/ अविनाश ढोणे, पोशि/ सुरज शिंदे, चापोहवा/प्रकाश चरडे यांनी पार पाडली आहे.

S. R. Ulhare.
PRO. SP office
Yavatmal